# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१४५** **दिनांक - १७/०४/२०२४**

## तक्रारदार यांची ऑनलाईन खरेदी करीत असताना झालेली आर्थिक फसवणूक १,७६,६५४/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील वालीव पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे **श्री. कौशल** हे ऑनलाईन घरगुती वस्तु खरेदी करीत होते. ऑनलाईन खरेदी करीत असताना ऑनलाईन पेमेंट करण्याकरीता क्यु आर कोड पाठवुन त्यावर स्कॅन करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी क्यु आर कोड स्कॅन केला असता त्यांचे **बँक खात्यातुन १,७६,६४५/- रु कपात** झाल्याबाबत मॅसेज त्यांचे मोबाईलवर प्राप्त झाला. तक्रारदार यांचे फसवणुकीबाबत

**सायबर पोलीस ठाणे येथे आवक अर्ज क्रमांक ८०२ -बी/२०२३ दिनांक ०१/०४/२०२३ अन्वये प्राप्त करण्यात आला आहे.**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरची फसवणूक झालेली रक्कम पंजाब नॅशनल बँकेचे संशयीत खातेधारकाचे खात्यात वळती झाल्याचे चौकशीत माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने तक्रारदार यांचे रक्कमेचे पुढील रक्कम व्यवहार रोखण्यासाठी तसेच तक्रारदार यांची रक्कम मिळविण्याकरीता तात्काळ संबंधीतांसोबत पत्रव्यवहार करण्यात आला.

तक्रारदार यांचे झाले फसवणुकीबाबत **वालीव पोलीस ठाणे गु.रजी नं ४३५/२०२३ भादविस कलम ४२० सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम ६६ डी प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तक्रारदार यांची रक्कम संशयीत खात्यात गोठविण्यात आल्यानंतर मा. न्यायालयात पाठपुरावा करुन तक्रारदार यांची **फसवणुक झालेली १,७६,६४५/- रक्कम त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **ऑनलाईन खरेदी करीत असताना ऑनलाईन वेबसाईटची पडताळणी केल्याशिवाय खरेदी/विक्री करुन नये.**
- **ऑनलाईन/विक्री खरेदी करीत असताना कोणत्याही क्यु आर कोडला स्कॅन करुन नये. तसेच आपले बँक खात्याची माहिती उघड करू नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, वेबसाईट, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, पोअं/राहुल बन, पोअं/कुणाल सावळे, पोअं/ विलास खाटीक, यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**